# जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

## (पुरवठा शाखा)

**दुरध्वनी व फॅक्स क्र. ०२१७-२७३१००३** **Email Id-dsosolapur2010@gmail.com**

क्र. पुशा/कार्या/२१(१)/आरआर- ८१७ /२०१६ दिनांक : १२ /०८/२०१६

**तातडीचे / महत्वाचे**

प्रति,

तहसिलदार ----------

**विषय :- लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अंत्योदय व बीपीएल कार्डधारकांना माहे ऑगष्ट, २०१६ करिता तूरडाळीचा पुरवठा करणेबाबत...**

**संदर्भ :**१) शासनाचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.अधापु-२०१६/प्र.क्र.६१/ना.पु.२२, दि.२१/०७/२१६

२) शासनाचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.अधापु-२०१६/प्र.क्र.११३/ना.पु.२२, दि.२८/०७/२०१६

३) शासनाचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.अधापु-२०१६/प्र.क्र.११३/ना.पु.२२, दि.२९/०७/२०१६

४) शासनाचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.अधापु-२०१६/प्र.क्र.११०/ना.पु.२२, दि.०२/०८/२०१६

५) शासनाचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.अधापु-२०१६/प्र.क्र.६१/ना.पु.२२, दि.०६/०८/२०१६

उपरोक्त विषयाबाबत, महाराष्ट्र शासनाचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील उपरोक्त संदर्भ क्र.१ वरील शासन निर्णयानुसार राज्यातील अंत्योदय व बीपीएल शिधापत्रिकाधारकांना लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत प्रतिमाह प्रति शिधापत्रिकाधारकास १ किलो याप्रमाणे तूरडाळ वितरित करण्याबाबतचा निर्णय घेतलेला आहे. त्याअनुषंगाने मा. उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील उपरोक्त संदर्भ क्र.२ व ३ वरील पत्रासोबतच्या विवरणपत्र-ब नुसार सोलापूर ग्रामीणसाठी बीपीएल शिधापत्रिकाधारक २०५१५९ व अंत्योदय शिधापत्रिकाधारक ७७८०८ एकुण २८२९६७ इतक्या शिधापत्रिकाधारकांना प्रतिकार्ड १ किलो याप्रमाणे २८२९.६७ क्विंटल नियतन मंजूर करुन उपरोक्त संदर्भ क्र.४ वरील पत्रान्वये २८२९ क्विंटल तूरडाळ NCDEX e Markets Limited यांनी प्राधिकृत केलेले पुरवठादार मे. माहेश्वरी अॅग्रो प्रॉडक्ट, सोलापूर यांचेकडून रक्कम रु.१०,१८५/- प्रतिक्विंटल या दराने शासकीय गोदामात तूरडाळ उपलब्ध करुन देणेसाठी नियतन मंजूर केलेले आहे. तसेच वाहतूकीचे दर व रास्तभाव दुकानदारांचे मार्जिन या दोन्ही बाबी अन्नधान्यासाठी असलेल्या विद्यमान दरानुसार अनुज्ञेय असल्याबाबतचे कळविले आहे.

तरी जिल्ह्यातील अंत्योदय व बीपीएल शिधापत्रिकाधारंकाची तालुकानिहाय व गोदामनिहाय उपलब्धता विचारात घेऊन शासनाचे मंजूर केलेल्या शिधापत्रिकेंच्या संख्येच्या प्रमाणात प्रतिमाह प्रतिशिधापत्रिकेवर १ कि.ग्रॅ. याप्रमाणात तूरडाळीच्या नियतनाचे तालुकानिहाय व गोदामनिहाय पुढीलप्रमाणे वितरण केलेले आहे.

**माहे ऑगष्ट, २०१६ अंत्योदय व बीपीएल योजनेकरिता तूरडाळ (प्रति क्विंटल दर- रु.१०,९८५/-)** आकडे क्विंटलमध्ये

| अ.क्र. | गोदामाचे नांव | कार्डसंख्या | | प्रति माह प्रति शिधापत्रिका १ किलो तूरडाळ याप्रमाणे शासनाने मंजूर केलेले नियतन | | मंजूर नियतनाच्या प्रमाणात गोदामनिहाय वाटप करावयाची एकूण तूरडाळ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अंत्योदय | बीपीएल | अंत्योदय | बीपीएल | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ४ |
| १ | उत्तर सोलापूर | २५२४ | ७६६० | २५.२४ | ७६.६० | १०२.०० |
| २ | दक्षिण सोलापूर | ३७५३ | ११४४४ | ३७.५३ | ११४.४४ | १५२.०० |
| ३ | मंद्रुप | २५११ | ८३४३ | २५.११ | ८३.४३ | १०८.०० |
| ४ | अक्कलकोट | ९३८१ | २००३४ | ९३.८१ | २००.३४ | २९४.०० |
| ५ | दुधनी | ११८२ | २४९६ | ११.८२ | २४.९६ | ३७.०० |
| ६ | बार्शी | ७०७१ | २९७१३ | ७०.७१ | २९७.१३ | ३६८.०० |
| ७ | वैराग | २०७१ | १४७९५ | २०.७१ | १४७.९५ | १६९.०० |
| ८ | मोहोळ | ४८४९ | १४२८३ | ४८.४९ | १४२.८३ | १९२.०० |
| ९ | माढा | १२३४ | ४३५८ | १२.३४ | ४३.५८ | ५६.०० |
| १० | कुर्डूवाडी | १४११ | ४५४९ | १४.११ | ४५.४९ | ५९.०० |
| ११ | टेंभुर्णी | १५५६ | ३४१७ | १५.५६ | ३४.१७ | ५०.०० |
| १२ | मोडनिंब | ५२४ | १५७६ | ५.२४ | १५.७६ | २१.०० |
| १३ | करमाळा | ३९०३ | १२१९९ | ३९.०३ | १२१.९९ | १६१.०० |
| १४ | जेऊर | १८४३ | ६६४४ | १८.४३ | ६६.४४ | ८४.०० |
| १५ | मंगळवेढा | ५३२३ | २१३९९ | ५३.२३ | २१३.९९ | २६७.०० |
| १६ | पंढरपूर | ९६१३ | ८९११ | ९६.१३ | ८९.११ | १८६.०० |
| १७ | सांगोला | ५७३१ | १८५८६ | ५७.३१ | १८५.८६ | २४३.०० |
| १८ | माळशिरस | ४४२१ | ४९६६ | ४४.२१ | ४९.६६ | ९४.०० |
| १९ | अकलूज | ६४२६ | ६८९२ | ६४.२६ | ६८.९२ | १३३.०० |
| २० | नातेपुते | २४८१ | २८१४ | २४.८१ | २८.१४ | ५३.०० |
| | एकूण | ७७८०८ | २०५१५९ | ७७८.०८ | २०५१.५९ | २८२९.०० |

तरी **उपरोक्त तक्त्यातील रकाना क्र.३ व ४ मध्ये दर्शविलेल्या शिधापत्रिकेच्या संख्येनुसार प्रतिशिधापत्रिका १ कि.ग्रॅ. याप्रमाणे संदर्भ क्र.५ वरील पत्रानुसार माहे ऑगष्ट, २०१६ करिता तूरडाळीचे वितरण करताना रु.१०३/- प्रति कि.ग्रॅ. या दराने तूरडाळीची विक्री करावयाची आहे. तसेच रास्त भाव धान्य दुकानदारांस तूरडाळीचा कोटा वितरित करताना वाहतूकीचे दर व रास्तभाव दुकानदारांचे मार्जिन या दोन्ही बाबी अन्नधान्यासाठी असलेल्या विद्यमान दरानुसार अनुज्ञेय राहतील. त्याचप्रमाणे रास्त भाव धान्य दुकानदारांकडून तूरडाळीसाठी चलनाने भरणा करावयाची रक्कम ही अन्नधान्यासाठी भरावायाच्या रकमेप्रमाणेच त्याच लेखाशिर्षाखाली म्हणजे ४४०८०१७५ वर जमा करावी व त्याबाबतचे स्वतंत्र लेखे ठेवण्यात यावेत.** त्याची माहिती इकडील कार्यालयास सादर करावी.

तूरडाळ पुरवठ्याबाबत करारनाम्यातील अटी व शर्तीस अधिन राहून तूरडाळीची उचल व वाटप करावयाची असून त्याबाबत खालील नमूद निर्देशांचेही काटेकोरपणे पालन झाले किंवा नाही याची दक्षता संबंधित तहसदिलदार यांचेवर राहील.

१) संबंधित पुरवठादार यांनी माहे ऑगष्ट, २०१६ साठी सोलापूर ग्रामीण करिता २८२९ क्विंटल इतकी तूरडाळ मंजूर असून ती जिल्ह्यातील सर्व शासकीय धान्य गोदामापर्यंत हमाली, चढाई, उतार व इतर सर्व अनुषंगिक खर्चासह प्रति क्विंटल दर रक्कम रु.१०,९८५/- या दराप्रमाणे पोहोच करावयाची आहे.

२) पुरवठादारांशी करारनामा केल्यानंतर पुरवठा आदेशानुसार पहिल्या १० दिवसांत ४०% व पुढील १० दिवसांत ६०% याप्रमाणे सर्व तूरडाळ पुरवठादारांनी पुरवावी लागेल.

३) पुरवठाराने तूरडाळ साठवणूकी / वाहतूकीच्या दरम्यान नुकसान किंवा खराब होऊ नये, याची पुरेशी काळजी घ्यावी लागेल. त्यांनी स्वतःच्या खर्चाने वाहतूकीच्या दरम्यानचा विमा उतरवला पाहिजे.

४) पुरवठादाराने वितरणाची तूरडाळ ५० कि.ग्रॅ. च्या गोण्यामधून व्यवस्थितरित्या शिवून शासकीय धान्य गोदामांपर्यंत पोहोच केली पाहिजे.

५) वजन आणि मापे यांचे मापदंड अधिनियम, १९७७ व अन्नसुरक्षा मानदंड अधिनियम, २००६ आणि त्याखालील नियमाप्रमाणे असलेली सर्व माहिती प्रत्येक गोण्यावर (उदा.- मिल, पॅकर यांची नांवे व पूर्ण पत्ता, वस्तूचे नांव, एकूण वजन, निव्वळ वजन, डाळीची श्रेणी, पॅक केलेला महिना व वर्ष इ.) माहिती अवश्य दिली गेली पाहिजे.

६) पुरवठादाराने अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांच्या संबंधीत घाऊक केंद्रावर डिलीव्हरी देताना खालील कागदपत्रे दिली पाहिजेत.

अ) व्यापारी इनवॉईस

ब) भारतीय अन्न सुरक्षा व मानक प्राधिकणाद्वारे अधिसूचित यादीनुसार कोणत्याही एनएबीएल मान्यताप्राप्त अन्न तपासणी प्रयोगशाळेकडून लोडिंग परीक्षकाचा अहवाल

क) लोडिंग पॉईंट आणि अनलोडिंग पॉईंटवरील इलेक्ट्रॉनिक वेब्रिज पावत्या (जर अनलोडिंग पॉईंटवर इलेक्ट्रॉनिक वेब्रिजची सुविधा उपलब्ध नसेल तर)

ड) अन्न, नागरी पुरवठा विभागाच्या गोदामपाल / गोदाम व्यवस्थापक / तहसिलदार यांनी दिलेली स्टॉकची पावती

आपल्या तालुक्यास माहे ऑगष्ट, २०१६ करिता उपलब्ध करुन देण्यात आलेली तूरडाळ पात्र शिधापत्रिकाधारकांना जलद गतीने वाटप होण्यासाठी तात्काळ रास्त भाव धान्य दुकानदारांना परमीट देण्यात यावेत. कोणत्याही परिस्थितीत गोदामांमध्ये तूरडाळ शिल्लक राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. सबब, तूरडाळ शिल्लक राहत असेल तर त्याबाबतचा अहवाल इकडील कार्यालयास कारणसह सादर करावा. तूरडाळीच्या वाटपाबाबत उचित प्रसिध्दी देण्यात यावी. रास्त भाव धान्य दुकानदारनिहाय मंजूर नियतनाची प्रत ग्रामस्तरीय व नगरपालिका स्तरीय दक्षता समितीच्या सदस्यांना उपलब्ध करुन द्यावी. तसेच मंजूर तूरडाळीच्या नियतनाची प्रत गोदामपाल / गोदाम व्यवस्थापक यांना बिनचूक देण्यात यावी. अपात्र शिधापत्रिका, बोगस शिधापत्रिकाधारक किंवा एकाच शिधापत्रिकेवर दुबार किंवा त्यापेक्षा जास्त वेळा तूरडाळ दिली जाणार नाही, याची दक्षता घ्यावी. तूरडाळीचा अपहार किंवा गैरमार्गाने विल्हेवाट होणार नाही, याचीही दक्षता घेण्यात यावी.

शासकीय धान्य गोदामामध्ये संबंधित पुरवठादाराकडून तूरडाळ आवक झाल्याचा व रास्त भाव धान्य दुकानदारांना वाटप केल्याचा दैनंदिन अहवाल इकडील कार्यालयास दररोज सकाळी १०.०० वाजेपर्यंत विहित नमुना प्रपत्रामध्ये सादर करणेबाबत संबंधित गोदामपाल / गोदाम व्यवस्थापक यांना आपले स्तरावरुन कळविण्यात यावे.

सही/-xxx<br>
**जिल्हा पुरवठा अधिकारी**<br>
**सोलापूर**

प्रत,

१) मा. उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

२) मा. उप आयुक्त पुरवठा, पुणे विभाग, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.

३) उप विभागीय अधिकारी ----------- विभाग -----------

४) पुरवठा निरीक्षण अधिकारी ------- --

५) गोदामपाल / गोदाम व्यवस्थापक ------------

६) संकलन २४(१०) / २४(३) / २४(५)/२२(१) माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

७) जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर diosur@gmail.com
२/- यांना कळविण्यात येते की, सोलापूर ग्रामीणसाठी मंजूर तूरडळ नियतनास बातमी या सदराखाली प्रसिध्द करण्यात यावे.

८) जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी, सोलापूर
२/- सदरचे पत्र सोलापूर जिल्ह्याच्या संकेतस्थळावर DSO कॉर्नरवर अपलोड करण्यात यावी.

**जिल्हा पुरवठा अधिकारी**<br>
**सोलापूर**